# <u>नियमीत दिवाणी दावा क्र. ५३४/२०२२ मध्ये निशाणी क्र. ११९ कडील अर्जावर</u>

## <u>आदेश.</u>

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ७ शामराव वीर यांच्यातर्फे त्यांच्या विरुध्द पारीत झालेला प्रकरण एकतर्फा चालविण्याबाबतचा आदेश रद्द करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जास वादींचे म्हणणे घेण्यात आले आहे. वादींतर्फे प्रस्तुत अर्जास दिलेल्या निशाणी क्र. १२१ कडील म्हणण्यामध्ये प्रस्तुत अर्जास तिव्र आक्षेप घेतला आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादीच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तिवादाकामी प्रतिवादी क्र. ७ ला व त्यांच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. ७ तर्फे युक्तिवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. ७ यांच्याविरुद्ध अद्याप एकतर्फा प्रकरण चालविण्याबाबत निशाणी क्र. १ वर आदेश पारीत झाल्याचे दिसून येत नाही. माझ्या मते प्रतिवादी क्र. ७ यांना या कामी हजर होण्याची व त्यांचा लेखी जबाब दाखल करण्याची संधी देवुन प्रस्तुतचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आ दे श</u>

१) प्रतिवादी क्र. ७ यांना या प्रकरणात हजर होण्यास व लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.09.18 17:33:33 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– १८/०९/२०२४ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.